CMYK



आजचा रंग : हिरवा

हिरवा रंग निसर्गाची ओळख,
आणि समृध्दीचं प्रतिक...


अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. २० ऑक्टोबर २०२३ | वर्ष : २२ वे | अंक : २२ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८


## चोरट्यांनी कॉपर वायर, ऑईलसह पावणेदोन लाखांचा मुद्देमाल चोरला

**सोलापूर** : जुना पुणे नाका येथील स्मशानभूमीजवळील महावितरणच्या रोहित्रांमधील १ लाख ६५ हजारांची कॉपर वायर व ऑईल चोरट्यांनी पळवून नेले आहे. याबाबत महावितरणचे सहायक अभियंता सुजित दत्तात्रय नागणे (वय-३२, रा. दानेश्वरी नगर, वसंत विहार) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन चोरट्याविरुध्द फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चोरट्यांनी महावितरणच्या रोहित्रामधील एक लाख २० हजारांची ७५० किलो कॉपर कॉईल (तांब्याची तार) व ४५ हजारांचे ४५० लिटर ऑईल असा एक लाख ६५ हजारांचा मुद्देमाल चोरट्यांनी चोरुन नेला. तपास पोलीस हवालदार कसबे हे करीत आहेत.

## 'माता सुरक्षित तर घर सुरक्षित, मातृत्त्वाचा सन्मान'

# शासनाच्या उपक्रमाची 'ऐशी की तैशी?'

- आरोग्य विभागाचा बोजवारा; दोन डॉक्टरांची गरज का?
- तिऱ्हे प्राथमिक आरोग्य केंद्राची दयनीय अवस्था;
- दोन डॉक्टर असूनही पंचायत; कारभार चालतो रामभरोसे!

सुराज्य/सोलापूर

**'माता सुरक्षित तर घर सुरक्षित, मातृत्वाचा सन्मान हाच आपला सन्मान' या महाराष्ट्र शासनाच्या या उपक्रमाची 'ऐशी की तैशी?' अशी परिस्थिती सध्या तिऱ्हे प्राथमिक आरोग्य केंद्राची झाली आहे. संपूर्ण आरोग्य खात्याला जणूकाही गालबोट लावण्याचा प्रकारच म्हणावा लागेल. 'रुग्णालय म्हणजे रुग्णांची सेवारूपी मंदिर', 'रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा' हे ब्रीदवाक्य घेऊन रुग्णांची अहोरात्र सेवा करणाऱ्या डॉक्टरी पेशाला काळिमा फासणे अथवा कलंकित करण्याच्या हा प्रकार नव्हे का? त्या डॉक्टरांचे काय? जे अहोरात्र प्रामाणिकपणे रुग्णांची सेवा करतात. दोन-चार अशा बेजबाबदार डॉक्टरांच्या कृतीने सर्व डॉक्टरी पेशाला गालबोट का लागू द्यायचे?**

तिऱ्हे प्राथमिक आरोग्य केंद्राची सध्या सर्वत्र चर्चा सुरू आहे ती, येथील संबंधित आणि जबाबदार वैद्यकीय अधिकारी, डॉक्टरांचा कामचुकारपणा, हलगर्जीपणा. येथील ढिसाळ कारभाराविषयीच्या आतापर्यत शेकडो तक्रारी शासनदरबारी धूळखात पडून आहेत. परंतु, येथील महिला व पुरुष डॉक्टरांचा मनमानी कारभार, बेजबाबदार वृत्तीचे सत्र थांबता थांबेना? एखाद्या निरपराध रुग्णाचा जीव गेल्यावरच शासनाला जाग येईल का? शासन दरबारी कारवाईचे सत्र कधी सुरू होईल? असा संतप्त सवालदेखील उपस्थित केला जात आहे.

तिऱ्हे प्राथमिक आरोग्य केंद्रात वारंवार बेजबाबदारपणाच्या घटना घडत आहेत. उपचारासाठी आलेल्या रुग्णांची सेवा करणे, हे आपले कर्तव्य असताना कर्तव्यात टाळाटाळ का केली जाते? रुग्णांची पिळवणूक, हेळसांड का केली जाते? एखाद्या आरोग्य केंद्रात तातडीने रुग्णांना औषधोपचार पुरविणे गरजेचे असताना विनाकारण अडवणूक करणे, डॉक्टर नाहीत म्हणून अन्यत्र पाठविणे, अथवा नर्स, आशावर्कर, सेवक-सेविका यांच्या मध्यमातून सेवा पुरविणे हा कोणता प्रकार? एखाद्याचा जीव जाण्याची प्रतीक्षा करावी का? संबंधीतांवर कारवाई का होत नाही? गोंधळलेल्या आणि घाबरलेल्या अवस्थेत अखेर नातेवाईकांनी रिक्षातून त्या महिलेला सोलापुरातील शासकीय रुग्णालयात आणले. सुदैवाने म्हणा अथवा दैवी आशीर्वादाने. मुख्य प्रवेशद्वाराजवळच ती महिला प्रसूत झाली. तिही सुखरूप आणि बाळही सुखरूप.

अतिशय गंभीर बाब असतानादेखील अद्यापपर्यंत आरोग्य विभागाने कर्तव्यात कसूर केलेल्या डॉक्टरांवर कोणतीही कारवाई का केली नसावी? ही होती पहिली घटना. काही दिवसांनी पुन्हा अशीच एक दुसरी गंभीर घटना घडली.

दि. १६ सप्टेंबर २०२३. सायंकाळी सात वाजण्याची वेळ होती. तिऱ्हे येथील अन्य एका महिलेला प्रसुती कळा आली, म्हणून तिच्या नातेवाईकांनी प्रसूतीसाठी येथे दाखल केले. परिस्थिती अतिशय नाजूक होती. मात्र दवाखाना बंद अवस्थेत असल्याचे दिसून आले. रुग्णांच्या नातेवाईकांची पंचायत झाली. करावे काय सुचेनासे झाले? येथील संबंधीत महिला डॉक्टरांना फोन केला. घटनेची माहिती दिली. एखाद्या डॉक्टरकडून अपेक्षीत मदतीची गरज असताना रुग्णांच्या नातेवाईकांना भलतेच उत्तर मिळाले. म्हणे 'माझी ड्युटी संपली आहे, मी नर्सला पाठवून देते', असे काम टाळू उत्तर देत, जबाबदारी झटकत 'त्या'महिला डॉक्टरांनी फोनच बंद केला. एखाद्या जबाबदार व्यक्तींकडून अशा प्रकाराची बेजबाबदारी. नातेवाईक हताश झाले. बिचारी 'ती' महिला असह्य अशा यातना सोसतच होती. सायंकाळ सात वाजल्यापासून ते रात्री एक वाजेपर्यत तिने कळ सोसला. रात्री साडेबारावाजेपर्यंत कोणत्याही प्रकारच्या उपचाराविना ती ताटकळली. बिचारीने ताटकळत असह्य अशा वेदना कशा सोसल्या असतील? आरोग्य केंद्रातील एकही कर्मचारी जागेवर नव्हता.

शेवटी त्या गावातील एका आशा वर्करने त्या महिलेची प्रसूती, डिलेव्हरी केली. प्रसूतीनंतर त्या बाळंतपण झालेल्या मातेला चक्कर येत होती. तिला अशक्तपणा जाणवत होता. तिची परिस्थिती नाजूक होती. अतिशय गंभीर बाब असताना अवघ्या २० ते ३० मिनिटातच त्या मातेला आणि तिच्या बाळाला घरी पाठवण्यात आलं. नियमानुसार कमीतकमी २४ तास डॉक्टरांच्या निगराणीखाली (ऑब्झर्व्हेशन) ठेवणे गरजेचे होते. मात्र येथील डॉक्टरांचा मनमानी कारभार आणि नियम धाब्यावर बसवून तिला घरी पाठवण्यात आले. ही बाब अतिशय गंभीर बाब आहे.






### ॲम्बुलन्सचीदेखील सोय नाही?

दि. ४ सप्टेंबर २००३ रोजीची ती यातनामय घटना, म्हणजे डॉक्टरी पेशाला काळिमा फासणारी घटनाच म्हणावी लागेल. या घटनेचा आशय असा की, दि. ४ सप्टेंबर २००३ रोजी सायंकाळी ४ वाजता तिऱ्हे गावातील एका महिलेला प्रसुती कळा आल्याने प्रसुतीसाठी तिला तिऱ्हे प्राथमिक आरोग्य केंद्रात तिच्या नातेवाईकांनी उपचारासाठी, बाळंतपण-डिलेव्हरीसाठी दाखल केले. तिच्यावर त्वरित औषधोपचार होणे गरजेचे होते. मात्र येथील परिस्थिती काही निराळीच होती. सदराचा दवाखाना बंद अवस्थेत असल्याचे दिसून आले. कारण मात्र वेगळेच सांगितले जाते. म्हणे रविवार आहे, सुट्टीचा दिवस असल्याची बतावणी करून महिला प्रसूतीची सोय नाही. रुग्णाला सोलापुरातील शासकीय रुग्णालयात घेऊन जावा, असे सांगण्यात आले. त्या गरोदर मातेच्या असह्य वेदनेने व्याकूळ झालेल्या नातेवाईकांचे टेन्शन आणखीन वाढले. एकतर आर्थिक परिस्थिती हलाखीची, रुग्णाला सोलापुरातील शासकीय रुग्णालयात नेणार तरी कसे? प्राथमिक आरोग्य केंद्रातून एखाद्या ॲम्ब्युलन्सचीदेखील सोय करता येऊ नये? दुर्दैव!



### निर्दयी, निष्ठुरतेचे कळसच गाठले!

असह्य वेदना, प्रसूती कळा आल्याचे अक्षःरशा वेदनेने तडपणारी माता. 'त्या' मातेच्या उदरात जन्माला येणार होत, एक गोंडस मुलं. तिने कळ सोसला. विषय परिस्थितीतून ती धैर्याने लढली. पण तिच्यासारखे धैर्य सर्वांमध्ये असेलच असे नाही. एका गंभीर परीस्थितदेखील तिऱ्हे प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरांच्या मनात 'त्या' गरोदर मातेविषयी थोडीदेखील करुणा अथवा दयामाया आली नसावी? एवढे निर्दयी, निष्ठूर कसे? यांनी जणूकाही निर्दयी, निष्ठूरतेचा कळसच गाठला आहे की काय? असेच म्हणावे लागेल.

### गेल्या आठ वर्षांपासून एकाच केंद्रात तळ ठोकून?



ऑपरेशन थीएटरची सोयी-सुविधा नसतानादेखील त्या ठिकाणी एक महिला आणि एक पुरुष असे दोन एमबीबीएस डॉक्टर गेल्या आठ वर्षांपासून तळ ठोकून कायम चिटकून आहेत. त्यांची बदली होऊनही ते येथे कायम कसे राहतात? त्यांना येथे कायम वर्षानुवर्षे ठेवण्याचे नेमके कारण काय असावे? सदरचे दोन्ही डॉक्टर मुख्यालय ठिकाणी राहत नसून, रात्रीच्यावेळी डिलेव्हरी पेशंट आल्यास त्यांची नक्कीच गैरसोय होत असते. दोन घटना ताज्या असताना पुन्हा भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडू नयेत, यासाठी जिल्ह्यातील सर्व आरोग्य केंद्रातील डॉक्टरांना मुख्यालय येथे राहणे बंधनकारक, सक्तीचे करण्यात यावे. वरील दोन्ही डिलेव्हरीबाबतीत कर्तव्यात कसूर, हलगर्जीपणा करणाऱ्या संबंधित डॉक्टरांवर तातडीने निलंबनाची कारवाई करण्यात यावी, अशी मागणी भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष संपदा जोशी आणि संकेत किल्लेदार यांनी 'सुराज्य'शी बोलताना केली आहे. सदरच्या घटनेसंदर्भातील कारवाईच्या मागणीचे निवेदन पालकमंत्री, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी यांना देण्यात आले आहे.




## माढा लोकसभा लढवणार नाही; शरद पवारांचे स्पष्टीकरण

सुराज्य/सोलापूर

माढा लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीबाबत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी निर्णय घेतला आहे. आपण निवडणूक लढवणार नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसकडून लोकसभा मतदारसंघाचा आढावा घेण्यात येत आहे. त्यात दिंडोरी मतदारसंघाच्या आढावा बैठकीत बोलताना मी लोकसभेची निवडणूक लढविणार नाही,' असे पवारांनी स्पष्ट केले.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरद पवार गटाकडून आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारसंघनिहाय आढावा बैठका घेतल्या जात आहेत. त्यात माढा मतदारसंघाच्या आढावा बैठकीत बोलताना सातारा आणि सोलापूर जिल्ह्यांतील नेतेमंडळींनी पवारांनी माढ्यातून निवडणूक लढवावी', अशी गळ घातली होती. त्यामुळे पवार माढ्यातून लढण्याचा निर्णय घेणार का? याची चर्चा जिल्ह्यात सुरू होती.

त्या बैठकीत पवारांनी या विषयावर बोलणे टाळले होते. मात्र, गुरूवारी नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी लोकसभा मतदारसंघाच्या आढावा बैठकीत शरद पवारांनी आपली भूमिका स्पष्ट केली. लोकसभेची निवडणूक मी लढवणार नाही. आगामी निवडणुकांमध्ये राज्यभरात दौरे करून संघटना मजबूत करण्यावर आपण भर देणार, असेही शरद पवार यांनी स्पष्ट केले. दरम्यान शरद पवार निवडणूक लढणार नसतील तर उमेदवार कोण असेल याची उत्सुकता लागली आहे.

## मारहाणीस कंटाळून विवाहित तरुणाची आत्महत्या; चौघांविरुद्ध गुन्हा

सुराज्य/सोलापूर

तुझ्या मेहुणी सोबत आमच्या मुलाचे लग्न लावून दे, या कारणावरून सतत मारहाण करून धमकी दिल्याच्या कारणावरून २५ वर्षीय विवाहित तरुणाने विष पिऊन आत्महत्या केली. ही घटना केडगाव (ता.करमाळा) येथे घडली.

या प्रकरणात करमाळ्याच्या पोलिसांनी एका महिलेसह चौघा विरुद्ध मारहाण आणि आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा नुकताच दाखल केला आहे. योग्य ऊर्फ योगेश बंटी काळे (वय २५ रा.केडगाव) असे त्या तरुणाचे नाव आहे. त्याने ५ ऑक्टोबर रोजी विष प्राशन केले होते. उपचारादरम्यान तो १५ ऑक्टोबर रोजी मयत झाला. या संदर्भात त्याचे वडील बंटी काळे (वय ५०) यांनी पोलिसात नुकतीच फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी पांढ्या ऊ फ' शंकऱ्या काळे, त्याची पत्नी सुधाबाई काळे, मुलगा शिरक्या काळे आणि चिंटू शाबू पवार (सर्व रा.केडगाव ता.करमाळा) या चौघा विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मयत योगेश ऊर्फ योग्या याच्या लहान मेहुणीसोबत आपला मुलगा शिरक्या काळे याचे लग्न लावून दे या कारणावरून वरील आरोपींनी योगेश आणि त्याच्या वडिलांना नेहमी मारहाण करून शिवीगाळ करत होते. तसेच आरोपींनी योगेश काळे याला घरी बोलावून त्याच कारणावरून मारहाण केली होती. या रोजच्या त्रासाला कंटाळून योगेश ऊर्फ योग्या याने विष प्राशन केले होते. उपचारादरम्यान तो मयत झाला. वरील आरोपीच्या त्रासाला कंटाळून आपल्या मुलाने आत्महत्या केली, असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास सहाय्यक निरीक्षक कुंजीर करीत आहेत.



## नेहरू युवा केंद्राच्या कार्यालयात सापडल्या दारूच्या बाटल्या

**सोलापूर** : नेहरू युवा केंद्राच्या वतीने व्यसनमुक्ती'चे कार्यक्रम राबविले जातील. या नेहरू युवा केंद्राच्या कार्यालयात दारूच्या बाटल्या आढळून आल्या आहेत. या दारूच्या बाटल्या कार्यालयातील स्टाफने आणल्याची माहिती समोर आली.

याप्रकरणी संबंधितावर कारवाई करावी, अशी मागणी भाजपकडून करण्यात आली आहे. या प्रकरणी निवेदन देण्यासाठी भाजपचे जिल्हा सरचिटणीस विकास वाघमारे आणि यतीराज होनमाने हे दोघेही नेहरू युवा केंद्रात गेले होते. तेव्हा नेहरू युवा केंद्राच्या कार्यालयात दारूचे रिकामे ग्लास आणि बॉटल्य भाजपच्या पदाधिकाऱ्यांना आढळून आले.

## भीमा नदीत पोत्यात हातपाय बांधून ठेवलेल्या स्थितीत मृतदेह आढळला

**पंढरपूर** : गुरसाळे (ता. पंढरपूर) येथील भीमा नदीच्या पात्रात एका तरुणाचा मृतदेह एका पोत्यात हात पाय बांधून ठेवलेल्या स्थिती आढळून आला आहे. यामुळे संबंधित तरुणाचा खून झाल्याचा पोलिस प्रशासनाकडून अंदाज लावण्यात आले आहे.

नदी पात्रातील बंधाऱ्यात अंदाजे ३५ ते ४० वयाचे पुरुष जातीचे सडलेल्या अवस्थेत मृतदेह गुरुवारी मिळून आला आहे. त्याच्या डाव्या हाताचे पोटरीवर मराठीत 'शीतल' व उजव्या हाताचे पोटरीवर मराठीत 'आश्विनी' व बदाम आकारामध्ये 'माँ' असे गोंदलेले आहे. उप विभागीय पोलिस अधिकारी अर्जुन भोसले, पोलीस निरीक्षक मिलिंद पाटील यांनी घटनास्थळी भेट दिली. तो मृतदेह संदीप अर्जुन माने (वय ३४, रा. बामणी, ता. सांगोला) याचा असल्याचे पुढे आले आहे. त्याचा खून कोणी व का केला याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

## कपाट फोडून पावणे चार लाखांचे दागिने लंपास

सुराज्य/सोलापूर

आसरा चौकातील टंकसाळ नगर येथे चोरट्याने कपाटाचे लॉक तोडून ३ लाख ७५ हजारांचे दागिने चोरून नेल्याची घटना दि. ८ ऑगस्ट ते १६ ऑक्टोबर २०२३ दरम्यान टंकसाळ नगर येथे घडली.याप्रकरणी मोयोद्दीन इस्माईल सय्यद (वय-५४,रा.टंकसाळ नगर, आसरा चौक) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.



सय्यद यांच्या घरामध्ये असलेल्या लाकडी शोकेसच्या कपाटामध्ये ३ लाख ७५ हजार रुपये किमतीचे मौल्यवान सोन्याचे दागिने ठेवले होते.त्यावेळी दि.१६ ऑक्टोबर रोजी लाकडी कपाटाची चावीचा शोध घेत असताना चावी कुठेही मिळून न आल्याने कपाटाचे लॉक तोडून पाहणी केली असता,त्यातील सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याचे त्यांना समजले. असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास पोसई गायकवाड हे करीत आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



त्यांच्याकडे लक्ष जावे' म्हणून तर अशी विधाने करत नसतील?


कल्याण
680-44-158

मुंबई
345-25-159


# भारतीय संघाचा सलग चौथा विजय

## किंग विराट कोहलीचे ४८ वे शतक; बांग्लादेशला ७ विकेट्सने नमवले

सुराज्य/पुणे

**गोलंदाजांच्या शानदार कामगिरीनंतर विराट कोहलीच्या ४८ व्या शतकाच्या जोरावर भारताने बांगलादेशवर ७ विकेटने विजय मिळवला. हा भारताचा विश्वचषकातील सलग चौथा विजय मिळवला.**



विजयासाठी २५७ धावांचा पाठलाग करताना कर्णधार रोहित शर्मा आणि शुभमन गिलने चांगली सुरूवात केली. या दोघांनी ८८ धावांची सलामी दिली. शर्माने ४० चेंडूत ४८ धावा केल्या. यात त्याने ७ चौकार आणि दोन षटकार ठोकले. त्यानंतर गिलने ५५ चेंडूत ५२ धावा करत विश्वचषकातील पहिले अर्धशतक ठोकले.श्रेयस अय्यर १९ धावा केल्या. तिसऱ्या क्रमाकांवर आलेल्या विराट कोहलीने सुरूवातीपासूनच आक्रमक खेळी केली. त्याने ९७ चेंडूत नाबाद १०३ धावा करीत कारकीर्दीतले ४८ वे शतक झळावत भारताना सामना जिंकून दिला. भारताचा पुढील सामना सलग ४ विजय मिळवलेल्या न्युझीलंड सोबत रंगणार आहे.तत्पूर्वी भारतीय गोलंदाजांच्या माऱ्यापुढे बांगलादेशने निर्धारित ५० षटकात आठ विकेटच्या मोबदल्यात २५६ धावांपर्यंत मजल मारली. चांगल्या सुरुवातीनंतर बांगलादेशची फलंदाजी ढेपाळली.

टी हसन आणि लिटन दास यांनी बांगलादेशसाठी आक्रमक सुरुवात केली. दोघांनी १४ षटकात ९३ धावांची भागिदारी केली. हसन याने ४३ चेंडूत ५१ धावांचे योगदान दिले. लिटन दास याने ६६ तर टी हसन याने ५१ धावांची खेळी केली. त्याशिवाय अखेरीस महमुदल्लाह याने ४६ धावांचे महत्वाचे योगदान दिले. भारताकडून रविंद्र जाडेजा, मोहम्मद सिराज आणि जसप्रीत बुमराह यांनी प्रत्येकी दोन दोन विकेट घेतल्या. दुखापतीमुळे बांगलादेशचा नियमित कर्णधार शाकीब अल हसन सामना खेळला नाही. त्याच्या जागी शांतो याने कर्णधारपदाची जबाबदारी स्वीकारली. दरम्यान, अष्टपैलू खेळाडू हार्दिक पांड्याला गोलंदाजी करताना दुखापत झाली. तिसरा चेंडू टाकल्यानंतर हार्दिक पांड्या दुखापतग्रस्त झाला.

## शहरात नऊ महिन्यात मालमत्तेचे २४६ गुन्हे उघडकीस

सुराज्य/सोलापूर

शहर गुन्हे शाखेने नऊ महिन्यात मालमत्तेचे एकूण २४६ गुन्हे उघडकीस आणले असून त्यातून एक कोटी ९५ लाख ६७ हजारांची मालमत्ता जप्त करण्यात आल्याची माहिती पोलीस उपायुक्त डॉ. दीपाली काळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शहर पोलीस आयुक्तालय हदीतील सात पोलीस ठाण्यांतर्गत जानेवारी ते सप्टेंबर २०२३ या नऊ महिन्यांच्या कालावधीत, घरफोडी, जबरी चोरी, वाहन चोरी आणि इतर चोर्या असे मालमत्तेचे एकूण ६०५ गुन्हे घडले होते. त्यामध्ये शहर गुन्हे शाखेने एकूण १४२ आरोपी अटक करुन, त्यांच्याकडून २४६ मालमत्तेचे गुन्हे उघडकीस आणले आहेत. गुन्हे शाखेने उघडकीस आणलेल्या गुन्ह्यांमध्ये एकूण २ कोटी ५ लाख ३२ हजार ७२४ रुपयांची मालमत्ता चोरीस गेली होती. त्यापैकी १ कोटी ९५ लाख ६७ हजार १०८ रुपये इतकी मालमत्ता हस्तगत केली आहे. गुन्हे शाखेने उघडकीस आणलेल्या गुन्ह्यातील मालमत्ता जप्तीचे प्रमाण ८९ टक्के इतके आहे. याशिवाय, शहर गुन्हे शाखेने खुनाचे २ व शरीराविषयक गंभीर ३ गुन्हे, असे एकूण ५ शरीराविषयक गुन्हे कौशल्यपूर्ण तपास करून, उघडकीस आणले आहेत. त्याचप्रमाणे, एकुण ८ फरार आरोपी, २९ पाहिजे आरोपी आणि ८ तडीपार आरोपी यांच्यावर कारवाई केली आहे.

CMYK